# लिंगभाव संवेदनशीलता

महिला विकास कक्ष
मुंबई विद्यापीठ

# लिंगभाव संवेदनशीलता

महिला विकास कक्ष
मुंबई विद्यापीठ

© महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ

पहिली आवृत्ती : ४ जानेवारी २०११

मुखपृष्ठ : प्रा. सीमा भोसले

मुद्रक/प्रकाशक
महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ
पहिला मजला,
डॉ. जे. पी. नाईक भवन
विद्यानगरी
मुंबई - ४०० ०९८

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

# मनोगत

संस्था व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांसाठी लिंगभाव संवेदना व स्त्री-पुरुष यातील निरोगी संबंध याविषयीची ही पुस्तिका प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासंबंधी सुप्रीम कोर्टाने दिलेले आदेश महाविद्यालयात खऱ्या अर्थाने पाळले जातात की नाही हे पाहण्यासाठी तसेच विद्यापीठाच्या कक्षेअंतर्गत समता, स्वातंत्र्य व न्यायाचे वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठ महिला विकास कक्षाला महाविद्यालयांपर्यंत पोहचण्याची निकड भासत होती. त्यासाठी विद्यापीठ महिला कक्षाच्या सभासदांनी बऱ्याच महाविद्यालयांना - विद्यार्थ्यांना भेटी दिल्या व त्या वेळी ज्या अनेक चर्चा, वादविवाद झाले त्याचे फलित म्हणजे ही पुस्तिका!

या चर्चा नंतर 'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' (TOT) या कार्यक्रमांतर्गत या विषयात रुची असणाऱ्या अनेक शिक्षकांपुढे सादर केल्या गेल्या. शहरी व ग्रामीण विभागातील महाविद्यालयात घेतल्या गेलेल्या विविध कार्यशाळांच्या अनुभवातून काही सत्रे/कृतिसत्रे कार्यशाळेसाठी निवडली गेली व त्यांचा उपयोग ही पुस्तिका बनवण्यासाठी झाला.

महिला विकास कक्षाची कार्याध्यक्ष या नात्याने माझे सहकारी व विद्यापीठ महिला विकास कक्षाचे सभासद यांच्याशी मनापासून केलेल्या या चर्चांचा व्यक्तिशः मला खूपच फायदा झाला.

या ठिकाणी महिला विकास कक्षाच्या सगळ्या उपक्रमांना सतत

पाठिंबा देणारे माजी कुलगुरू माननीय डॉ. विजय खोले यांच्याबद्दल मला कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. महिला विकास कक्षाचे अध्यक्ष या नात्याने परिसंवाद/कार्यशाळा घेण्यासाठी त्यांनी कक्षाला सतत प्रोत्साहन दिले तसेच संलग्न महाविद्यालयातील महिला कक्षांना या विषयाचे गांभीर्य लक्षात यावे या गोष्टीवर भर दिला. ही पुस्तिका तयार करण्याचा प्रस्ताव त्यांच्याच कार्यकाळात मांडण्यात आल्या व त्यांनी त्याचा मनःपूर्वक पुरस्कार केला.

सध्याचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांचाही महिला विकास कक्षाला व त्याच्या उपक्रमांना तितकाच पाठिंबा मिळत आहे.

स्त्रिया व मुली यांना सगळ्या ठिकाणी नेहमीच सुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करण्याची आज गरज आहे. मला आशा वाटते की विद्यापीठात व महाविद्यालयात लिंगभाव-जाणिवेचा संदेश रुजवण्यासाठी या पुस्तिकेची मदत होईल.

**डॉ. क्रांती जेजुरकर**
जानेवारी २०१०



# कृतज्ञता

विविध व्यक्ती व संस्था यांचे अथक प्रयत्न व त्यांनी दिलेले योगदान यामुळेच ही पुस्तिका तयार होऊ शकली. पुस्तिकेच्या पहिल्या विभागाचा मसुदा तयार करून महिला विकास कक्षाच्या सभासद प्रा. अंजली कानिटकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. पहिल्या विभागातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करताना त्यांच्या या विषयातील सखोल ज्ञानाचा आम्हांला खूप उपयोग झाला. नरसी मोनजी महाविद्यालयातील प्रा. ब्रिजेंद्र यांनीही पहिल्या मसुद्यावर प्रतिक्रिया दिल्या, लिखाणात मदत केली व पुस्तिका तयार करण्यात मोलाची मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानणे हे आमचे कर्तव्य आहे. तसेच कार्यशाळा सत्रातील विविध भागांचे लेखन करण्यासाठी पी. डी. कारखानीस महाविद्यालयाच्या प्रा. सुनीता कुलकर्णी यांचीही मदत झाली.

पुस्तिका तयार करताना चर्चेसाठी आपला बहुमोल वेळ व विस्तृत, विचारगर्भ व अतिशय महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिल्याबद्दल महिला कक्षाच्या सभासद प्रा. शमा दलवाई व डॉ. चयनिका शहा यांचे आम्ही ऋणी आहोत.

महिला विकास कक्षाच्या सचिव डॉ. रेखा महाडेश्वर यांनी अगोदरचे मसुदे एकत्रित करण्याचे महत्त्वाचे काम केले आणि या वेगळ्याच परंतु महत्त्वाच्या विषयावरची पुस्तिका वाचकांना सुलभ वाटेल अशा रीतीने संकलित करण्याचे जिकिरीचे काम त्यांनी जबाबदारीने पार पाडले.

'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' या कार्यक्रमात सहभागी झालेल्या शिक्षकांच्या

सूचनांचाही ही पुस्तिका तयार करताना उपयोग झाला. 'The campagin against sexual harassment at workplace' या India Centre for Human Rights Law या संस्थेने प्रशिक्षणासाठी तयार केलेल्या पुस्तिकेतील काही भाग या पुस्तिकेत वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल महिला विकास कक्ष त्या संस्थेचा विशेष आभारी आहे.

प्रा. प्रज्ञा दया पवार—ज्ञानसाधना महाविद्यालय व प्रा. सुनीता कुलकर्णी—पी. डी. कारखानीस महाविद्यालय यांनी मूळ इंग्रजीत असलेल्या या पुस्तिकेचे सुलभ मराठी भाषांतर केले आहे.

तसेच या पुस्तिकेचे मुखपृष्ठ ज्यांनी तयार केले त्या रचना संसद महाविद्यालयाच्या प्रा. सीमा भोसले यांचेही या ठिकाणी आभार मानणे अप्रस्तुत ठरणार नाही.

या पुस्तिकेसाठी बऱ्याच तज्ज्ञांचा व कार्यकर्त्यांचा सल्ला घेण्यात आला. ज्यांनी ज्यांनी यासाठी आपला वेळ दिला त्यांचे आम्ही आभारी आहोत.



# सरनामा

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सुप्रसिद्ध विशाखा निवाड्यामध्ये (१९९७) घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार २००१ साली मुंबई विद्यापीठामध्ये 'विद्यापीठ महिला विकास कक्षा'ची स्थापना झाली. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणुकीपासून स्त्रियांना सुरक्षितता मिळावी या प्राथमिक उद्देशाने महिला कक्षाची स्थापना झालेली असून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४च्या कलम १४ (८) अन्वये अधिकाराअंतर्गत १८ जानेवारी २००८ रोजी कुलगुरूंनी दिलेल्या आदेशानुसार महिला कक्षाचे नियमन होते.

स्थापना झाल्यापासून महिला कक्षाने विद्यापीठीय नोकरदारवर्ग आणि महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये लिंगभावात्मक दृष्टिकोण रुजावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्याकरिता त्यांना एका व्यासपीठावर एकत्रित येण्यास प्रोत्साहन देऊन उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये लिंगभावात्मक समानतेचा पुरस्कार करण्यासंबंधीचे त्यांचे विचार आणि त्यासंबंधी त्यांना वाटणाऱ्या चिंतेला, आस्था-विषयांनादेखील कक्षाने मोकळी वाट मिळवून दिली आहे. गेल्या आठ वर्षांत विद्यापीठ महिला विकास कक्षाने तीन राष्ट्रीय चर्चासत्रे तसेच अनेक विभागीय कार्यशाळा आयोजित करून स्त्री-प्रश्नाच्या व्यापकतेकडे त्यांचे लक्ष वेधले तसेच लैंगिक छळवणुकीला आळा घालण्यासाठी तसेच महिलांना कामासाठीचे सुयोग्य पर्यावरण मिळावे यासाठी आवश्यक ती मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली.

गेल्या आठ वर्षांचा अनुभव लक्षात घेता महिला विकास कक्षाचा

प्रयत्न हा सातत्याने अधिकाधिक महाविद्यालये, शिक्षक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे असा राहिलेला आहे. अर्थात प्रत्येक महाविद्यालयामध्ये महिला विकास कक्ष स्थापन व्हावा, त्याचे काम विद्यार्थी तसेच शिक्षकांपर्यंत पोहचावे एवढ्याच मर्यादित हेतूने नव्हे तर या सर्व महाविद्यालयीन महिला विकास कक्षांनी लैंगिक छळवणुकीच्या प्रश्नावर काम करताना लिंगभावात्मक समतेची व्यापक विचारदृष्टी लक्षात घ्यावी यासाठी विद्यापीठ महिला कक्ष प्रयत्नशील आहे. महाविद्यालयीन महिला विकास कक्षांच्या समन्वयकांसाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठ महिला कक्षाने या हेतूनेच राबविले आहेत. तसेच महाविद्यालयांमध्ये वर्षभर चालणाऱ्या कार्यशाळांमधून शिकविण्यासाठी विषयाची रुची असणारे तज्ज्ञ प्राध्यापक शोधण्याचे काम देखील विद्यापीठ महिला कक्ष सातत्याने करीत असते. लिंगभावात्मक जाणिवजागृतीची चळवळ व्यापक स्तरावर पोहचवण्याच्या उद्देशानेच विद्यापीठ महिला कक्षाने प्रस्तुत पुस्तिका बनवण्यात पुढाकार घेतला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये विविध महाविद्यालयांना भेटी देऊन तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या काही शिबिरांमध्ये आयोजित केलेल्या प्राथमिक कार्यशाळांमधील प्रत्यक्ष अनुभवाच्या आणि त्या आधारे केलेल्या निरीक्षणांच्या मदतीने ही पुस्तिका बनविण्यात आली आहे.

या पुस्तिकेच्या पहिल्या विभागामध्ये विद्यापीठ महिला विकास कक्षाच्या दृष्टीने प्रमुख आस्था-विषयांची चर्चा केली आहे. त्यामध्ये लिंगभावात्मक न्यायासाठीचे सकारात्मक वातावरण विकसित व्हावे या हेतूने वैयक्तिक आणि संस्थात्मक जबाबदाऱ्या कोणत्या असाव्यात यासंबंधीच्या सुयोग्य दृष्टिकोणाची चर्चा तर आहेच पण त्याचबरोबर संस्थांसमोर कायमच उभे राहणारे प्रश्नही विचारात घेतले आहेत. या सर्व मुद्द्यांवर विद्यापीठ महिला विकास कक्षाचा नेमका दृष्टिकोण काय आहे याची चर्चा येथे विस्ताराने केली आहे.

दुसऱ्या विभागामध्ये अर्ध्या दिवसाच्या कार्यशाळेमधील सत्रांच्या तपशिलांची चर्चा केली आहे. प्रत्येक विभागाची उद्दिष्टे, संभाव्य कार्यप्रकार आणि प्रत्येक विभागाचे अपेक्षित फलित यांच्या आधारे सत्रांचा विचार इथे केला आहे. परस्परसंवादी पद्धतींचा वापर असलेले कार्यप्रकार



सुचवून कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांना त्यांच्या मनातील स्त्री व पुरुषांसंबंधीचे पूर्वग्रहदूषित विचार प्रकट करायला लावून लिंगभावात्मक संवेदनशील जाणिवेच्या दिशेने त्यांना काही पावले पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक सत्राला एक विशिष्ट वेळेची चौकट दिलेली असून सहभागी होणाऱ्याला लिंगभाव, लैंगिकता, लैंगिक छळवणूक या संकल्पनांची तसेच लैंगिक छळवणुकीला आळा घालण्यामध्ये विद्यापीठ महिला विकास कक्ष तसेच महाविद्यालयीन महिला विकास कक्षाच्या भूमिकेची ओळख करून दिली गेली आहे.

अर्थात या सर्व मुद्द्यांवरील अंतिम शब्द आपण उच्चारत आहोत अशी या पुस्तिकेची भूमिका नसली तरी या मुद्द्यांवर एक विवेकशील चर्चा सुरू करण्याचा प्रयत्न मात्र इथे नक्कीच केला आहे. आम्हाला आशा आहे की महाविद्यालयीन महिला विकास कक्ष आपापल्या महाविद्यालयांच्या प्रांगणामध्ये लिंगभावात्मक संवेदनशीलतेचे संवर्धन व्हावे या दृष्टीने एक आश्वासक पर्यावरण निर्माण करण्यासाठीची पहिली पायरी म्हणून या पुस्तिकेचा वापर करतील.

## लिंगभावात्मक संवेदनशीलता—काळाची गरज

### महाविद्यालयीन लैंगिक छळाचा मुकाबला करताना — एक दृष्टिकोण

**विषयओळख**

सर्वच समाजांमध्ये स्त्रियांना त्या स्त्रिया असल्यामुळे कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या भेदभावाला आणि छळाला सामोरे जावे लागते. जात, वर्ग, प्रदेश, वंश आणि धर्म या सर्व भेदांना ओलांडत स्त्रियांचा छळ सर्वव्यापी स्वरूपात आपल्या दृष्टीस पडतो. स्त्रिया मग त्या प्रौढ असोत की अल्पवयीन मुली असोत, सर्व समाजात आणि समाजांतर्गत उपगटात शारीरिक, लैंगिक आणि मानसिक छळाचा सामना करीत असतात.

सर्वच समाजांमध्ये 'लैंगिक छळ' हा स्त्रीविरोधी हिंसाचाराचा एक सर्रास आढळणारा प्रकार आहे. घर, शाळा, महाविद्यालये, कार्यालये, रोजगाराची सर्व ठिकाणे आणि अर्थातच सर्व सार्वजनिक स्थळे अशा जवळपास प्रत्येक ठिकाणी त्यांना लैंगिक छळाला सामोरे जावे लागते. १९९७ साली गाजलेल्या विशाखा खटल्याच्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होत असलेल्या लैंगिक छळाला आळा घालण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली. हा एक ऐतिहासिक निकाल असून त्यात स्त्री-नोकरदारांना कामाच्या दृष्टीने एक अनुकूल सुरक्षित असे पर्यावरण मिळवून देण्याची जबाबदारी रोजगार देणाऱ्याची असते, मग ते शासन असो वा सार्वजनिक/खाजगी कंपनीचे मालक असोत, असा स्पष्ट निर्देश आहे. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्त्रियांना



रोजगाराची समान संधी मिळण्याबरोबरच रोजगाराच्या ठिकाणी त्यांची अप्रतिष्ठा होणार नाही याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. स्त्री-सबलीकरणासाठी आणि लिंगभावात्मक न्यायासाठी कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण असणे ही एक पूर्वअट मानली गेली आहे.

तरुण मुलामुलींचा मोठा वावर असणारी विद्यापीठे आणि महाविद्यालये ही लैंगिक छळाच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणे असणार यात शंकाच नाही. त्यामुळेच या उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये केवळ लैंगिक छळवणुकीला आळा घालणारी धोरणे वा यंत्रणा पुरेशा नसतात तर विद्यार्थ्यांमध्ये तसेच संस्थाचालकांमध्ये लिंगभावात्मक न्यायाची जाणीव रुजावी यासाठी निरनिराळे उपक्रम, कार्यशाळा घेणे अधिक आवश्यक बनते.

**चिंता कशाची वाटते?**

मुंबई विद्यापीठाच्या 'विद्यापीठ महिला विकास कक्षा'मार्फत आम्ही गेली आठ वर्षे विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांतील लैंगिक छळवणुकीच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा करीत आहोत. त्याचबरोबर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये लिंगभावात्मक न्याय-जाणीव रुजावी याकरिता कार्यशाळांचेही आयोजन केले जाते.

हे उपक्रम राबवतानाच आमच्या लक्षात आले की विशाखा निवाड्यातील मार्गदर्शक तत्त्वांची जर खऱ्या अर्थाने अंमलबजावणी व्हावयाची असेल तर लैंगिक छळवणूक रोखण्यासाठीची जबाबदारी असणाऱ्या सर्व घटकांना लैंगिक छळवणुकीसंबंधी विविध बाबींबाबतचा तसेच व्यापक अर्थाने स्त्री-प्रश्नाबाबतचा योग्य दृष्टिकोण समजलेला असणे आवश्यक आहे. याच परिप्रेक्ष्यातून काही कळीच्या मुद्द्यांची चर्चा पुढे केली आहे.

**लैंगिक छळ म्हणजे काय याबाबतचा समजच पूर्वग्रहदूषित**

एक सर्रास आढळणारा समज म्हणजे काही स्त्रिया आपल्या विशिष्ट प्रकारच्या वर्तन-व्यवहारातून लैंगिक छळ ओढवून घेतात आणि म्हणून जर अशा स्त्रियांवर किंवा त्यांच्या वर्तनावर बंधने घातली तर लैंगिक

छळवणुकीला आळा घालता येतो. प्रत्यक्षात हे नीटपणे समजून घेण्याची आवश्यकता आहे की लैंगिक छळवणूक ही पुरुषप्रधान समाजातून उद्‌भवणाऱ्या अनेक समस्यांमधली एक मुख्य समस्या असून ती मूलत: समाजातील स्त्री-पुरुष सत्ताव्यवहारातून आकार घेत असते.

याचबरोबरीने विद्यार्थिनींकडे व एकूणच स्त्रियांकडे पाहण्याचे पुरुषांचेच नव्हे तर स्त्रियांचे असणारे विशिष्ट विषमतावादी दृष्टिकोणही आपण जागोजागी अनुभवत असतो. 'समाजमान्य वर्तन' म्हणजे काय किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्या गोष्टी असू नयेत यासंबंधीचा विचार या दृष्टिकोणातून घडत असतो. याच दृष्टिकोणाच्या आधारे विद्यार्थ्यांनी, विशेषत: विद्यार्थिनींनी, कोणते कपडे घालावेत / घालू नयेत; विरुद्धलिंगी व्यक्तीबरोबर कसा व्यवहार ठेवावा / ठेवू नये; मैत्रीचे स्वरूप कसे असावे; कसे दिसावे आणि अशा इतरही अनेक वर्तन-व्यवहारांचे नियमन करण्याची, त्यांना निषेधार्ह ठरवण्याची वा शिक्षा करण्याची आवश्यकता व्यक्त होताना आपण पाहत असतो.

अनेक महाविद्यालयांमध्ये असे 'उपद्रवकारक' वर्तन रोखण्यासाठी मुली आणि स्त्रियांवर विविध प्रकारची बंधने घातली जातात. या बंधनांमध्ये प्रामुख्याने त्यांची वेषभूषा, त्यांची हालचाल, त्यांचे मित्रसंबंध इत्यादी बाबींचा समावेश असतो. विद्यार्थ्यांना अधिक स्वातंत्र्य बहाल करण्यातून किंवा त्यांना अधिकाधिक पर्याय उपलब्ध करून देण्यातून महाविद्यालयाच्या प्रांगणात बेशिस्त व त्याहून वाईट म्हणजे लैंगिक अनाचार बळावतो, ज्यायोगे नैतिक अध:पतनाची प्रक्रिया सुरू होते असे मानले जाते. विद्यार्थिनींच्या वेषभूषेवर किंवा वर्तनावर नियंत्रण घातले नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाते असा ठाम विचार आढळतो. आणि म्हणूनच अशा घटना घडायच्या नसतील तर नियंत्रणे लागू करण्याकडे एकूण कल दिसतो. या सगळ्याच्या मुळाशी जे आधारतत्त्व असते ते असे की मुलींची/स्त्रियांची लैंगिक छळवणूक थांबवायची असेल तर सर्वप्रथम त्यांनी आपले वर्तन/व्यवहार सुधारायला हवे. संयमाने वागायला हवे जेणे करून मुलांचे/पुरुषाचे त्या अकारण लक्ष वेधून घेणार नाहीत. त्यांचे वर्तन मर्यादशील असावे... अशा रीतीने नियमनाचे वा शिस्तीचे 'प्रयोग' लैंगिक छळवणूक रोखण्यासाठी मूलभूतरित्याच



आवश्यक मानले जातात.

लैंगिक छळवणूक थांबवण्याच्या नावाखाली उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये स्त्रियांवर बंधने घातली जाणे ही महिला विकास कक्षाच्या दृष्टीने अतिशय चिंताजनक बाब आहे. आपल्या क्षमतेनुसार आपले पंख फैलावता येतील असे, आपल्याला सक्षम बनवणारे मैत्रसंबंध निर्माण करता येतील असे आणि एकूणातच व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि निर्णयक्षमतेचा सन्मान ठेवणारे वातावरण विकसित करण्याऐवजी मुलींच्या सर्वांगीण विकासाला आणि सर्जनशीलतेला लगाम घालणारे नियम महाविद्यालयादी संस्थांनी बनवणे ही सर्वथा चुकीची गोष्ट आहे.

महाविद्यालये-विद्यापीठांच्या प्रांगणात सुयोग्य वर्तन-व्यवहार असायला हवा हे महत्त्वाचे असले तरी ते मुलींच्या वैयक्तिक आकांक्षांना लगाम घालून वा त्यांच्यासाठीचे नियम बनवून व्हायला नको. परस्परसन्मान आणि सहिष्णुतावादी जाणिवेतून, सर्वांना समान पातळीवरील स्वातंत्र्य व निर्णयक्षमता असते या जाणिवेतून तसेच परस्परसंमतीने मित्रसंबंध/नातेसंबंध निर्माण करण्याच्या स्वातंत्र्यातूनच जबाबदार वर्तन आकार घेत असते.

विद्यापीठ/महाविद्यालयाच्या प्रांगणांमध्ये १८ ते २५ वयोगटातील मुलामुलींचा भरणा असतो. यातील बहुतेक मुलं आयुष्यात प्रथमच स्वातंत्र्याचा, मुक्त पर्यावरणाचा अनुभव घेत असतात. कारण तोवर त्यांनी शिस्तशीर शिक्षक आणि पालकांच्या करड्या नजरेवर/नियंत्रणावर अतोनात विश्वास ठेवणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेतलेले असते. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांसाठी प्रथमच विरुद्धलिंगी व्यक्तींबरोबर मित्रसंबंध/नातेसंबंध जोडता येण्याच्या व्यामिश्र स्वरूपाच्या शक्यता महाविद्यालयांमध्ये खुल्या होत असतात. या मैत्रीतून आपसुकपणे येणारे लैंगिक आकर्षण व अवघडलेपणाबद्दल वाटणारी उत्सुकता मुलांना एका नव्या सार्थकतेच्या वा निराशेच्या भावविश्वात घेऊन जात असते. सोबतच्या मित्रगटाचे दडपण तर त्यांच्यावर असतेच असते.

तरुणांच्या या सगळ्या गुंतागुंतीच्या तसेच काहीशा गोंधळलेल्या भावविश्वाकडे पाहण्याचा आपल्याकडील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचा

दृष्टिकोण सहसा एकच एक आणि सरधोपट असतो, आणि तो म्हणजे त्याकडे डोळेझाक करणे. कारण या साऱ्या बाबी अध्ययन व अध्यापन प्रक्रियांच्या दृष्टीने गैरलागू आणि त्यामुळे निरुपयोगी असतात! म्हणजे विद्यार्थ्यांना स्त्री-पुरुष म्हणून एक लैंगिक ओळखदेखील असते याचा विचारही न करणे. तसेच मुलामुलींमधील संबंध (म्हणजे बऱ्याचदा लैंगिक संबंध) महाविद्यालयाच्या आवारात निर्माण होणार नाहीत यासाठीचे नियमनाचे, शिस्तीचे वातावरण निर्माण करण्यावर भर असतो. मुलामुलींमध्ये संपूर्णपणे अलगाव किंवा वेषभूषेबाबतचे नियम यापासून ते मुलगा-मुलगी 'अशोभनीय' वर्तन करताना आढळले तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे अशाच प्रकारचे बहुधा हे नियमन असते. अर्थातच महाविद्यालयाचे चालक ठरवतील ते वर्तन अशोभनीय ठरत असते. कमीजास्त फरकाने याच गोष्टी विविध महाविद्यालयांमध्ये आढळून येतात. सर्वांमध्ये समान असणारी बाब म्हणजे ही नियमनाची यंत्रणा राबवताना मुलामुलींमध्ये आपसुकपणे फरक केला जात असतो. मुलींसाठी ही नियंत्रण यंत्रणा अधिकच कठोर असते.

शिक्षण हे महाविद्यालयांचे प्राथमिक आणि सर्वाधिक महत्त्वाचे कर्तव्य असले तरी महिला विकास कक्षाची अशी भूमिका आहे की शिक्षण हे फक्त पुस्तकांतूनच दिले जाते असे मानणे योग्य ठरणार नाही. विद्यार्थ्यांना लिंग, जात, धर्म, वर्ग यामुळे उद्भवणाऱ्या विविधतेचा मान ठेवण्यास शिकवणे; प्रौढ नातेसंबंधातील—विशेषत: घनिष्ठ नातेसंबंधातील—जबाबदारीविषयी त्यांची जाण वाढवणे ही देखील उच्च शिक्षणसंस्थांची जबाबदारी असते. आणि हे करायचे असेल तर विद्यार्थ्यांमध्ये परस्परसंवाद, वादविवाद, चर्चा आणि संपर्काच्या अधिकाधिक संधी घडविणारे असे मैत्रीपूर्ण, खुले आणि निर्भयकारी पर्यावरण कसे निर्माण होईल हे पाहणे आवश्यक बनते.

लैंगिक छळवणूक होणार नाही यासाठी महाविद्यालये करीत असलेल्या काही आम प्रतिबंधात्मक उपायांची चर्चा यानंतर केली आहे. महिला विकास कक्षाच्या सदस्यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक शहरी-ग्रामीण महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील प्रत्यक्ष अनुभव आणि त्या अनुभवावर आधारित निरीक्षणे इथे नोंदवली आहेत.



### वेषभूषेबाबतचे नियम

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त रुजविण्यासाठी मुंबई विद्यापीठातील अनेक महाविद्यालयांनी उचललेले पाऊल म्हणजे वेषभूषेबाबतचे नियम. हा मार्ग सगळेच चोखाळताना दिसतात हे तर आहेच पण त्याचबरोबर तो लोकप्रिय आणि स्वीकारार्हदेखील दिसतो. हे नियम मूलत: विद्यार्थिनींसाठी असतात; अर्थात काही महाविद्यालयांमध्ये मुलांसाठी देखील काही नियम केले गेले आहेत. मुलींसाठी बहुतेकदा स्लीव्हलेस ड्रेसेस, स्पॅघेटी स्ट्रॅप्स, कमरेखाली असणाऱ्या जीन्स (लो वेस्ट जीन्स), तंग टी-शर्ट हे पोशाख आक्षेपार्ह मानले जातात. महाविद्यालय कोणत्या परिसरात आहे यावर आक्षेपार्ह पोशाखांची यादी बदलत राहते. उदारहणार्थ, मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या एका ग्रामीण महाविद्यालयामध्ये मुलींनी पंजाबी ड्रेस घातला तर त्यावर महिला डॉक्टरांसारखे अॅप्रन घालणे सक्तीचे केले गेलेले आढळले. अलीकडेच मुंबईतील एका महाविद्यालयाने जीन्स घातलेल्या मुलींना प्रवेश देण्यास नकार दिला होता.

मुलींवर हा आरोप केला जातो की जर त्यांना त्यांच्या आवडीचे कपडे घालण्याची परवानगी दिली तर त्या अधिकाधिक शरीर प्रदर्शन करणारे कपडे घालतात. असे कपडे घालणाऱ्या मुली चांगल्या नसतात, त्या मुलांना सैल वर्तन करायला भाग पाडतात आणि त्यातूनच पुढे या मुलींची छेडछाड होते. कधी कधी तर त्यांना शारीरिक लैंगिक हिंसेलाही सामोरे जावे लागते. या सगळ्याचा अर्थ असा की, जर 'अशा' मुलींची छेडछाड वा त्यांच्यावर लैंगिक हिंसाचार करावा असे मुलांना वाटले तर त्यात मुलांचा काहीच दोष नसतो. मुली स्वत:च हे भागधेय ओढवून घेत असतात.

आणि म्हणूनच 'मुलींसाठी वेषभूषेबाबतचे नियम असणे हे मुलींच्याच सुरक्षिततेच्या दृष्टीने फायद्याने असते.' कारण मुलींच्या मोकळ्याढाकळ्या वेषभूषेमुळे मुले चाळवली जातात आणि मग ती मुलींवर अत्याचार करतात, असे मानले जाते. 'मुलं ही अखेर मुलंच असतात' असा पक्का भारतीय समज असल्याने मुलांना सार्वजनिक ठिकाणी (आणि घरांमध्येदेखील) कसे राहायचे याची शिस्त लावत

बसण्याऐवजी मुलींनीच आपल्या 'सुयोग्य' वर्तनाने मुलांना दूर ठेवावे हे ओघानेच येते. सुयोग्य वर्तनातली मूलभूत बाब म्हणजे सुयोग्य वेषभूषा, जी परिधान करून मुलींना मुलांपासून आपली सुरक्षितता जपता येते.

## महिला विकास कक्षाची भूमिका

मुलींसाठीच्या वेषभूषेबाबतच्या नियमांतून काहीही साध्य होत नसते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या बातम्यांवर एक धावती नजर टाकली तरी हे लक्षात येते की, स्त्रियांनी कसेही कपडे घातलेले असोत; साडी, पंजाबी, स्कर्ट, घागरा-चोळी असे काहीही, त्यांच्यावर लैंगिक हल्ले होतातच. अल्पवयीन मुलींवर इतकेच नव्हे तर चिमुरड्या मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार हेच दर्शवतात की वेषभूषेतून लैंगिक अत्याचार उद्भवत नसतात आणि असे म्हणणे निव्वळ अर्थहीन आहे.

तसेच, महाविद्यालये ही जर पौगंडावस्थेतील मुले आणि तरुण-तरुणींसाठी असतील तर स्व-संबंधीचे निर्णय घेण्याचे—ज्यात कोणते कपडे घालायचे हेही आले—स्वातंत्र्य मुलांना असणे आवश्यकच आहे. पोशाख हा केवळ अंगावर कुठले तरी कपडे परिधान करण्याइतका किरकोळसा मुद्दा असत नाही तर तो आकांक्षा, मैत्री, स्वओळख आणि आत्मविश्वासाशी अतूटपणे जोडलेला मुद्दा असतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे. तुम्हाला काय व्हायचे आहे, तुम्हाला कोणता मित्र परिवार हवा आहे या बाबी तुमच्या वेषभूषेतून निश्चित होत असतात. पोशाख हा तुमच्या एकूण व्यक्तिमत्त्वाशी जोडलेला तर असतोच पण इतरांसमोर तुम्हाला स्वत:ला कसे दर्शविले जावेसे वाटते यातही तुमचा पोशाख महत्त्वाची भूमिका बजावत असतो. तुम्हाला जो पेशा स्वीकारायचा आहे, त्याची चुणूक तुमच्या वेषभूषेतून मिळत असते.

तसेच कोणत्या वेळी कोणते पोशाख घालावेत याबद्दल सगळेच, विशेषत: महाविद्यालयीन विद्यार्थी तर, अतिशय चोखंदळ असतात. उदाहरणार्थ, लग्नसमारंभात, उत्सवात वा मृत्यूसमयी किंवा मुले रोज महाविद्यालयामध्ये येताना किंवा एखाद्या विशिष्ट दिवशी उदाहरणार्थ,



'कॉलेज डे' अथवा 'ट्रॅडिशनल डे'ला वेगवेगळ्या पोशाखांची निवड करीत असतात. त्यामुळे मुलांना हे तारतम्य शिकण्याची संधी देण्याचे काम महाविद्यालयाचे असायला हवे. गरज पडल्यास त्यांना मार्गदर्शन करा. पण सक्तीचे, सनातनी विचार मनात वागवत, सर्व झाकपाक करणारे पोशाख त्यांना (विशेषत: मुलींना) घालायला लावणे योग्य नव्हे. अशा नियमनातून मुलींच्या विवेकशक्तीचा अपमान तर होतोच पण त्याचबरोबर मुलींना आपण अधू असण्याची, मुलांपेक्षा आपण कमी पर्यायाने कमी मुक्त असल्याची जाणीव त्यांच्यामध्ये रुजविण्याचा गुन्हा आपण करत असतो. आपल्या या अविवेकी दृष्टीचा परिणाम मुलींना सुरक्षित करण्याऐवजी त्याच गतानुगतिक पारंपरिक पुरुषी चौकटी भरभक्कम होण्यात होत असतो हे आपल्या लक्षात येत नाही.

दुसऱ्या बाजूला महाविद्यालयांमध्ये मुलींवर लैंगिक अत्याचार/हिंसाचार होणार नाही याची खातरजमा करणे हेही आपले काम असते. त्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी अशा दोघांबरोबर योग्य सामाजिक वर्तन कसे असावे यासाठी आपला एक चांगला संवाद असणे आवश्यक असते. मुलांना हे सांगायला हवे की मुली जेव्हा आकर्षक पोशाख परिधान करत असतात तेव्हा आपली छेडछाड व्हावी वा आपल्यावर लैंगिक हल्ला व्हावा अशी त्यांची इच्छा नसते. आणि त्यांचा वेष हा कधीही त्यांना लैंगिक नाते ठेवायचे आहे अथवा नाही हे सूचित करत नसतो!

## मुला-मुलींना एका बाकावर बसण्यास/एकमेकांबरोबर वेळ व्यतीत करण्यास प्रतिबंध

मुलींना मुलांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी वेषभूषेवरील नियमन हा सर्वाधिक लोकप्रिय, मान्यताप्राप्त आणि भरपूर उलटसुलट चर्चा झालेला विषय असला तरी मुली-मुलांमधील इतर प्रकारचे संपर्कदेखील नियंत्रणात ठेवण्याचा, इतकेच नव्हे तर शक्यतो ते निर्माण होणार नाहीत हे पाहण्याचा प्रयत्न महाविद्यालयांमध्ये होत असतो. आजही अनेक महाविद्यालयांमध्ये आढळणारा एक उपाय म्हणजे वर्गामध्ये मुलामुलींना एका बाकावर बसण्यास प्रतिबंध करणे किंवा कॉलेजच्या आवारात मुलामुलींना एकत्र गप्पा मारण्यास, उभे राहण्यास बंदी करणे. या

बंदीमध्ये मुलामुलींच्या कंपूवरच नव्हे तर एक मुलगा-एक मुलगी अशा जोडीवरही प्रतिबंध घातला जातो.

अगदी ज्या महाविद्यालयात मुले-मुली एकत्र शिकतात, एकाच वर्गात असतात तिथेही वर्गातील मुलामुलींची बसण्याची नेहमीची रीत पाहिली तर हे एकच असणे किती फसवे असते ते कळून चुकते. बहुतेकदा वर्गातील दोन वेगवेगळ्या भागांत वा कोपऱ्यात मुले व मुली बसतात. क्वचितच काही मुली व मुलं या अलिखित सीमारेषेचा भंग करताना दिसतात. अनेक शिक्षकांना मुलं-मुली एकत्र बसलेले आवडत नाही. एका बाकावर शेजारी शेजारी मुलगा-मुलगी किंवा दोन बाजूला मुले व मधे मुलगी किंवा उलट हे तर बहुतेक शिक्षकांच्या अभिरुचीला पटणारे नसते. सुदैवाने सर्व शिक्षक असे नसतात.

अनेकांच्या म्हणण्यानुसार ही बाकड्याबाकड्यांमधील आणि बाकड्यांवरची मुलामुलींची घसट संकटांना निमंत्रण देणारी असते. यातून मुले मुलींकडे आकर्षित होऊ शकतील आणि अयोग्य काही घडू शकेल अशी भीती अनेकांना वाटते. त्यामुळे सावध असणे आणि असे 'संकट' निर्माण करणारी संधीच न देणे हे शिक्षकांसाठी महत्त्वाचे कर्तव्य बनते. मुला-मुलींनी वर्गात वेगवेगळेच बसायला हवे. आणि अर्थातच एक मुलगा एकाच मुलीच्या शेजारी बसत असेल तर ती 'जोडी'च असणार असे गृहीत धरून त्यांना एका विशिष्ट व्यवहाराला-प्रतिसादांना सामोरे जावे लागते. अनेक महाविद्यालयांमध्ये अशा जोड्यांकडे अकारण सर्वांचे लक्ष केंद्रित होते, त्यांच्याविषयी चर्वितचर्वण केले जाते आणि काही वेळेस चक्क हस्तक्षेपही केला जातो.

### महिला विकास कक्षाची भूमिका

एकत्र बसण्यातून-वावरण्यातून मुला-मुलींमध्ये निर्माण होणारे संपर्क/मैत्रीपूर्ण संबंध रोखणे ही चुकीची गोष्ट आहे. अशी 'नैतिक पोलीसगिरी' करणे आपण टाळायला तर हवेच पण अधिक मोकळे पर्यावरण निर्माण कसे करता येईल यासाठी प्रयत्नशीलदेखील असायला हवे. जोवर आपण मुले-मुली एकत्र बसण्यातून काय घडेल याबाबतच्या अकारण भीतीतून मुक्त होणार नाही तोवर आपण मुला-मुलींमध्ये



चांगल्या तऱ्हेचे मैत्रसंबंध वा संपर्क निर्माण होण्यास अडसरच बनू. उलटपक्षी, आपण मुला-मुलींना एकमेकांशी संबंध कसे ठेवायला हवेत हे सांगायला हवे. भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल वाटणारे आकर्षण समजावून सांगून एक जबाबदार मित्र असणे म्हणजे काय हे सांगणे आवश्यक आहे. यातूनच पुढे आपण काय टाळायला हवे हेही सांगू शकतो.

खरे तर व्यामिश्र स्वरूपाची विविधता आणि कैक प्रकारचे भेदाभेद असणाऱ्या आपल्या समाजात मुलांना सुजाण नागरिक बनविण्यास हातभार लावू शकू असा उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचा आदर्श व्यवहार असायला हवा. वेगवेगळ्या लिंग-जात-धर्म आणि वर्गांच्या विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींबरोबर सुयोग्य व्यवहार करायला मुलांनी शिकायला हवे. भेदाभेद नसलेल्या सार्वजनिक आयुष्यात नागरिक म्हणून पाय ठेवण्यापूर्वी या अलगाव नसलेल्या शिक्षणाची विद्यार्थ्यांना मोठी गरज असते. आपल्या समाजामध्ये आजही सार्वजनिक क्षेत्रामध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे महाविद्यालये-विद्यापीठांमध्ये मुलींना सार्वजनिक क्षेत्र व्यापण्यासाठी अधिकाधिक सक्षम बनवणे आणि हे वास्तव मुलांना स्वीकारायला लावणे हे प्राथमिक कर्तव्य असायला हवे. मुलामुलींचा अलगाव हा या प्रक्रियेमधला सर्वात मोठा आणि घातक अडसर मानावा लागेल.

### घर आणि वसतिगृहांमधील वेळ-पालनाविषयीची बंधने

भारतातील मुलींना आणि स्त्रियांना वेळ-पालन या नियमाचे समानपणे आणि सातत्याने पालन करावेच लागते. किरकोळसे अपवाद वगळता, मुलींवर व स्त्रियांवर, मग त्यांचे वय कितीही असो, हे निर्बंध असतातच. हे निर्बंध घरातही असतात आणि वसतिगृहातही. मग ती वसतिगृहे विद्यार्थिनींची असोत वा नोकरदार स्त्रियांची. तेथे येण्याजाण्याच्या वेळा निश्चित असतात व अतिशय कठोरपणे त्यांचे पालन होणे अपेक्षित असते. जर त्या पाळल्या नाहीत तर तुम्हाला दंड, कधी कधी बाहेरचा रस्ता दाखवणे अशी शिक्षादेखील होऊ शकते. ही समस्या तरुण मुलांसाठी वा सर्व प्रकारच्या पुरुषांसाठी मात्र कधीही असत नाही.

मुलींसाठीच्या संचारबंदीच्या वेळा या बव्हंशी संध्याकाळच्या आणि

रात्रीच्या असतात. मुलींनी रात्री उशिरापर्यंत बाहेर राहू नये ही त्यांच्या पालकांची इच्छा असते. जर एखादी स्त्री ही नोकरदार स्त्रियांसाठीच्या वसतिगृहात राहत असेल किंवा पेईंग गेस्ट म्हणून कुणा कुटुंबाबरोबर राहत असेल तर तिला पहिला प्रश्न हाच विचारला गेलेला असतो की तुम्ही कामावरून/महाविद्यालयातून परत किती वाजता येणार? जर ती वेळ 'सुरक्षित' आणि 'सभ्य' नसेल तर मग तुमची निवासव्यवस्था होणेच अवघड होऊन बसते.

या संचारबंदीच्या तासांमागील गृहीतक हे मूलत: नैतिक स्वरूपाचे असते. ज्या मुली/स्त्रिया रात्री उशिरापर्यंत बाहेर कामे करतात, ज्यांच्या वेळा नियमित नसतात, किंवा ज्या आपल्या मित्रांबरोबर वेळ व्यतीत करतात किंवा अगदी स्वत:साठीच्या काही गोष्टी करतात त्या सर्व जणी एक प्रकारे 'संकटाला आमंत्रण' देत असतात आणि त्यांच्या चारित्र्याबद्दल शंका घेतली जाते. या स्त्रियांचे उदाहरण नेहमी 'स्त्रिया कशा नसाव्यात' हे सांगण्यासाठी घेतले जाते किंवा 'त्यांना कळत नाही, त्या काय करीत आहेत ते' असा एकूण त्यांच्याविषयी बोलतानाचा आव असतो.

अर्थात या संचारबंदीच्या तासांना एक व्यापक आयामदेखील आहे. संध्याकाळी उशिराच्या आणि रात्रीच्या वेळा या जणू पुरुषांना मुक्तपणे विहार करता येण्यासाठीच्या वेळा असतात. त्या वेळी एकांडे पुरुषच नव्हे तर कुटुंबकबिला असणारे पुरुषदेखील आपल्या मित्रपरिवारासोबत बाहेर पडत असतात. हे 'मोकाट' फिरणारे पुरुषच स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करणारे संभाव्य गुन्हेगार मानले जातात. या परिस्थितीशी मुकाबला करण्याचे अनेक मार्ग उपलब्ध असूनही भारतामध्ये स्त्रियांना व मुलींना रात्रीच्या वेळी कैद करून मोकाट फिरणाऱ्या पुरुषांपासून त्यांना 'सुरक्षित' ठेवणे व त्यांचे 'शील' सांभाळणे हेच उपाय अवलंबिले जातात.

या सगळ्याचा अर्थ असा नक्कीच नव्हे की संध्याकाळी उशिरा किंवा रात्री घराबाहेरील काम करणाऱ्या स्त्रिया असत नाहीत. पण महत्त्वाची गोष्ट अशी की त्यातल्या फारच कमी स्त्रिया स्वत:च्या बळावर बाहेर असतात. बहुतेकदा त्या त्यांच्या नात्यातील पुरुषांबरोबर काही कामासाठी बाहेर असतात. आपल्या मनाला येईल ती गोष्ट करण्यासाठी त्या कधीही



बाहेर पडत नाहीत. नुसतं रस्त्यावर उभे राहणे, इकडे तिकडे फिरणे त्यांना शक्य नसते. असे करताना एखादी जरी स्त्री आढळली तरी ती संकटाला, म्हणजे लैंगिक अत्याचाराला निमंत्रण देणारी मानली जाते. घरी असण्याच्या वेळेत बाहेर असणाऱ्या स्त्रिया या वाईट चालीच्या स्त्रिया ठरतात आणि त्यामुळे त्यांना छेडछाड वा अगदी अत्याचारांना सामोरे जावे लागणारच, नव्हे त्यांनाच ते हवे असणार, असे मानले जाते.

**महिला विकास कक्षाची भूमिका**

आम्हाला असे वाटते की स्त्रियांनी सावध असण्याची आणि आवश्यक ती काळजी घेण्याची गरज असली तरी मुलींसाठी व स्त्रियांसाठी संचारबंदीची वेळ निश्चित करण्यातून लिंगभावात्मक भेद अधिक घट्ट होत जातो. तसेच अशी संचारबंदी असणे ही सरळ सरळ विषमतावादी बाब आहे. सार्वजनिक यंत्रणा आणि पोलिसांनी स्त्रियांना कोणत्याही वेळी मुक्त संचार करता यावा यासाठी दक्ष राहायला हवे. त्याचबरोबरीने आपण पुरुषांना सार्वजनिक ठिकाणी प्रत्येक समयी शिस्तीने आणि जबाबदारीने वर्तन करायला शिकवणे आवश्यक आहे. सर्व ठिकाणी आणि प्रत्येक समयी मुलींना/स्त्रियांना निर्धोकपणे विहार करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. परंतु स्त्रियांसाठी असे सुरक्षित पर्यावरण बनवण्यासाठी स्त्री-स्वातंत्र्य आणि निर्णयक्षमतेबाबतच्या आपल्या सामाजिक व राजकीय दृष्टिकोणामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. त्याचबरोबरीने सार्वजनिक क्षेत्रामधील स्त्रियांचे अस्तित्व आणि पुरुषांचे जबाबदारीने वागणे हेही आपल्याला मान्य करावे लागेल. स्वातंत्र्य आणि सुरक्षितता या बाबी एकमेकांना वर्ज्य असत नाहीत आणि स्त्री-पुरुषांना या दोन्ही बाबी प्रत्येक समयी अनुभवता आल्या पाहिजेत, असे आमचे मत आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात रोजगाराचे स्वरूप हे अधिकाधिक व्यामिश्र आणि सातत्याने परिवर्तनशील होत आहे. त्यामुळे या बदलत्या संदर्भामध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी स्त्रियांना वेगवेगळ्या तऱ्हेची कौशल्ये अंगी बाणवावी लागणार आहेत. रात्री उशिरा काम करणे आणि आपल्या इच्छेप्रमाणे मोकळा वेळ घालवता येणे हे देखील स्त्रियांसाठी अटळ बनणार आहे. महिला विकास कक्षाला असे वाटते

की तरुण मुलींना निर्धोकपणे कोणत्याही वेळेत व्यवहार करता येतील याची मुख्य जबाबदारी त्यांच्या सोबत काम करणाऱ्यांची असते. ती त्यांनी पेलायला हवी. सुरक्षिततेच्या खोट्या कल्पनेपायी तरुणींवर वेळेची संचारबंदी घालणे हे चुकीचे ठरेल. आमच्या मते मुलांची मानसिकता बदलण्यामध्ये महाविद्यालये कळीची भूमिका बजावू शकतात.

### आपण काय करू शकतो?

या व्यापक संदर्भचौकटीमध्ये आमच्या महिला विकास कक्षाची भूमिका लिंगभाव समानतेचा विचार कार्यशाळा, चर्चासत्रे आणि व्याख्यानांद्वारे महाविद्यालये/विद्यापीठांमध्ये रुजविण्याची तसेच विद्यार्थ्यांशी दैनंदिन पातळीवर संपर्कात असणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण करण्याची आहे. त्या दृष्टीने ही पुस्तिका आम्ही शिक्षकांसाठी तयार केली आहे. या पुस्तिकेतून त्यांना आमच्या चिंतेचे मुद्दे कळतील, आमच्याशी संवाद करावा असे त्यांना वाटेल आणि अंततः महाविद्यालयांमध्ये मुलींसाठी एक मोकळे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल अशी आमची भावना आहे.

मुंबई विद्यापीठातील बहुतेक महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची (एन.एस.एस.) शिबिरे आयोजित केली जातात. त्यामधून शिक्षकांना या विषयावरील चर्चा मुलांबरोबर करता येतील. अशा शिबिरांमध्ये मुले-मुली एकत्र येतात; काही दिवस एकत्र राहतात; सामाजिक सेवेचे उपक्रम राबवतात आणि साहचर्याचा भाव जोपासतात. अर्थातच, अशी शिबिरे भरविणे ही तणावकारक बाब असते. कारण मुलांच्या वर्तन-व्यवहारावर लक्ष ठेवून काही 'अघटित' घडणार नाही हे पाहण्याची जबाबदारीही शिक्षकांवर असते.

त्यामुळे या एन.एस.एस. शिबिरामध्ये एखादा संपूर्ण दिवस हा 'लिंगभावात्मक संचेतन आणि सक्षम बनवणारे नातेसंबंध' या विषयावरील चर्चेसाठी राखून ठेवण्यात यावा. या व्यासपीठावर या प्रश्नासंबंधीचे विविध दृष्टिकोण तर समोर येतीलच पण मुलांना आपले विचार, आपल्या चिंता व्यक्त करण्याची संधी देखील मिळेल आणि या चर्चेमुळे त्यांना लिंगभावात्मक तसेच लैंगिक नातेसंबंधीची गतिकी, तिचा



विचार-व्यवहार समजणे सोपे जाईल.

महाविद्यालयाच्या प्रांगणात 'लिंगभावात्मक संचेतन' निर्माण करण्यासाठीची कार्यशाळा कशी घ्यावी याची विशिष्ट पद्धतदेखील या पुस्तिकेत दिलेली आहे. पण या पुस्तिकेत मूलतः मार्गदर्शक तत्त्वेच दिलेली आहेत. शिक्षकांनी इच्छा असल्यास आपापली उदाहरणे त्यात समाविष्ट करावीत असे आम्हाला वाटते. महिला विकास कक्षाकरिता या मुद्द्यांकडे बघण्याचा दृष्टिकोण आणि विचार हा अधिक महत्त्वाचा आहे. त्यामुळेच या पुस्तिकेतील माहिती आणि त्यातील युक्तिवाद शिक्षकांना त्यांच्या एन.एस.एस. शिबिरांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये उपयोगी ठरतील अशी आम्हाला आशा आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये लिंगभावात्मक संवेदनशीलता आणि सक्षम बनवणाऱ्या नातेसंबंधांची संकल्पना रुजविण्यासाठी शिक्षकांनी काही नावीन्यपूर्ण पद्धतींचा वापर करावा अशी आमची त्यांना विनंती आहे. गटचर्चा, नाट्याभिनय, बतावणी/सोंग असे खेळ आणि परस्परसंवादाला पूरक ठरणारे इतर उपक्रम राबवून सर्व विद्यार्थ्यांना या विषयावरील चर्चेत सामील करून घेणे आणि त्यांच्या मनातील चिंता-समस्या-विचारांना वाट मोकळी करून देणे हा आपला उद्देश असायला हवा. काही निवडक सिनेमा/नाटकांचे प्रयोगदेखील यासाठी उपयोगी ठरू शकतात. या पुस्तिकेमध्ये दिलेल्या कार्यप्रकारांमध्ये कुठल्याही प्रकारची भर ही निश्चितच स्वागतार्ह आहे.

# विभाग २

महाविद्यालयातील महिला-विकास कक्षांतून लिंगभाव-जाणीव-कार्यशाळा घेताना त्यांनी काही मुद्दे चर्चेला घ्यावेत या उद्देशाने ही पुस्तिका हेतूपूर्वक तयार करण्यात आली आहे. त्यांपैकी काही महत्त्वाचे हेतू असे...

१) विद्यार्थ्यांच्या लिंगभाव जाणिवा स्पष्ट करणाऱ्या प्रतिक्रिया व त्यांना दिला जाणार संस्थांचा प्रतिसाद तपासणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये निरोगी व सकारात्मक वातावरण तयार करण्याची गरज लक्षात आणून देणे.

३) स्त्रिया व मुलींच्या बाबतीत समानतेचे वातावरण तयार करण्यासाठी व्यक्तिगत व संस्थात्मक पातळीवरच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करणे.

४) तक्रार निवारण पद्धत समजून घेणे.

वरील हेतू साध्य करण्यासाठी व कार्यशाळांतील आशयात समानता असावी यासाठी विद्यापीठ महिला कक्षाने ही पुस्तिका तयार केलेली आहे.

चर्चा, प्रतिक्रिया यांना भरपूर वेळ ठेवून चार भागांचे प्रतिमान तयार केले आहे. प्रत्येक भागात काही कृती व महत्त्वपूर्ण मुद्दे समाविष्ट केले आहेत. त्यांची चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे. चौथा भाग हा पूर्णपणे माहिती देणारा असल्याने त्यात कृतींचा समावेश नाही परंतु त्यावर चर्चा होऊ शकते. प्राध्यापक या पुस्तिकेचा वापर करताना योग्य व उपयुक्त वाटेल अशा गोष्टींची, उदाहरणांची भर घालू शकतात.



**रूपरेषा**

सत्र पहिले — लिंग व लिंगभाव

सत्र दुसरे — लैंगिकता : व्यक्तिगत मर्यादा व सत्ता

सत्र तिसरे — कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (महाविद्यालय परिसर)

सत्र चौथे — महाविद्यालयातील महिला विकास कक्षाची भूमिका

### सत्र पहिले

# लिंग व लिंगभाव

## (Gender and Sex)

पितृसत्ताक पद्धती, सत्ता, लैंगिकता, लैंगिक छळ या संज्ञांचे अर्थ नीट आकलन होण्यासाठी लिंग व लिंगभाव (Gender and Sex) या संकल्पना समजणे गरजेचे आहे.

या सत्राचे मुख्य हेतू —

१) लिंग व लिंगभाव (Gender and Sex) या संकल्पना समजावून देणे.

२) लिंगभाव ही सामाजिक संकल्पना असून ती बदलता येते हे समजून घेणे.

**कृतिसत्र १**

**लिंग व लिंगभाव** (Gender and Sex) वेळ १५ मि.

विद्यार्थ्यांना याबद्दल काय माहिती आहे ती जाणून घेणे.

या चर्चेनंतर मुलांना खालील विधाने पूर्ण करावयास सांगणे.

**मुलांना**

मी मुलगा आहे म्हणून मी हे करू शकतो.

मी मुलगा आहे म्हणून मी हे करू शकत नाही.



**मुलींना**

मी मुलगी आहे म्हणून मी हे करू शकते.

मी मुलगी आहे म्हणून मी हे करू शकत नाही.

विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचा आपण **Gender and Sex** या संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी उपयोग करू शकतो.

त्यानंतर खालील व्याख्या स्पष्ट कराव्यात.

**लिंग (Sex)**

लिंग म्हणजे पुरुष व स्त्रिया यांतील शारीरिक व जैविक फरक. हा सार्वकालिक व न बदलणारा असतो.

लिंग म्हणजे स्त्री किंवा पुरुष असण्याचे जैविक वैशिष्ट्य आणि ते गुणसूत्रांनुसार ठरते.

**लिंगभाव (Gender)**

एखादी व्यक्ती स्त्री आहे किंवा पुरुष आहे म्हणून तिच्याकडून ज्या अपेक्षा केल्या जातात त्याचा संदर्भ लिंगभावाशी असतो. स्त्रिया व पुरुष यांच्यात समाजाने निर्माण केलेला संबंध म्हणजे लिंगभाव.

एकाच घरातील किंवा संस्कृतीतील स्त्री-पुरुषांमधील फरक म्हणजे लिंगभाव. हा फरक समाज व संस्कृतींनी घडवलेला असतो व तो काळानुसार बदलत असतो.

**कृतिसत्र २**

अगोदरच्या चर्चेत आलेल्या प्रतिसादांचा वापर करून विद्यार्थ्यांच्या लिंगभावानुसार ठरणाऱ्या भूमिका. त्यातील साचेबद्धता, पितृसत्ता या गोष्टी समजावून द्याव्या. 'साचेबद्ध भूमिका' यावर मुक्त चर्चा सोदाहरण घडवावी.

खालील व्याख्यांनी समारोप करावा

**लिंगभावात्मक भूमिका** : स्त्रिया व पुरुष यांचे समाज व संस्कृती यांच्याकडून अपेक्षित वर्तन.

**साचेबद्ध भूमिका** : व्यक्तीच्या सामाजिक कृतीबद्दल समाजाने ठरवलेले मापदंड आणि त्या मापदंडानुसार जर व्यक्तीचे वर्तन असेल तरच तिचे वर्तन समाजाकडून स्वीकारले जाते.

**पितृसत्ता :** ही एक अशी सामाजिक संरचना असते की जिच्यात सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय कल्पनाच नव्हे तर सवयी व रितिरिवाज यांवर पुरुषांचे वर्चस्व असते व स्त्रियांची भूमिका दुय्यम असते.



**सत्र दुसरे**

# लैंगिकता : व्यक्तिगत मर्यादा व सत्ता

एक शिक्षक म्हणून आपल्याला हे समजत नाही की आपल्याला व विद्यार्थ्यांना अवघड न वाटता त्यांच्याशी लैंगिक भावनांबद्दल कसे बोलावे. यासाठी लैंगिकता या गोष्टीवर संवाद होण्याची, ती समाजमान्य होण्याची गरज आहे. मुलांना लैंगिक इच्छा, भावना असतात आणि त्याची त्यांना जाणीवही असते. त्यांना ती वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्तही करायची इच्छा असते. इथेच आपल्याला एक शिक्षक आणि महिला कक्ष म्हणून मध्यस्थी करण्याची किंवा त्यांच्याशी संवाद साधून त्यांना सावध करण्याची वा मार्गदर्शन करण्याची गरज असते. लैंगिकता ही नैसर्गिक गोष्ट असून त्याचा बाऊ करण्याची किंवा भीती बाळगण्याची गरज नाही.

खालील हेतू मनात ठेवून हे सत्र घ्यावे.

—'लैंगिकता' ही संकल्पना स्पष्ट करणे.

— सकारात्मक/नकारात्मक लैंगिक वर्तन म्हणजे काय ते समजून घेणे.

— 'व्यक्तिगत मर्यादा' ही संकल्पना स्पष्ट करणे.

— लैंगिकता व सत्ता या गोष्टींवर चर्चा करणे.

## लैंगिकतेचा अर्थ

### कृतिसत्र १

'लैंगिकता' म्हणजे काय यावर मुक्त चर्चा घेऊन विद्यार्थ्यांची मते जाणून घ्या. त्यांचा प्रतिसाद फळ्यावर लिहा. जर मुलांना त्यांच्या भावना

किंवा विचार शब्दांत व्यक्त करता येत नसतील तर लैंगिक उद्‌बोधन, सामाजिक लिंग, जवळीक, शृंगारिक हालचाली, शारीरिक संवेदना, भावना-आठवणी, स्वत:चे शरीर-विचार, स्वप्नावस्था या विषयांवर चर्चा करा.

या चर्चेतून व्यक्ती जरी प्रत्यक्ष लैंगिक कृती किंवा वर्तन करीत नसल्या तरी सगळ्याच व्यक्ती लैंगिक असतात, या मुद्द्यांपर्यंत पोहचू शकतो इतर कुठल्याही मानवी कृतींसारखीच लैंगिक कृती ही एक कृती आहे व तो आपल्या शरीराचा, वर्तनाचा, आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. जरी ही भावना शरीराच्या माध्यमातून व्यक्त होत असली तरी त्यात भावना, विचार, मूल्ये, निष्ठा यांचाही समावेश असतो.

### कृतिसत्र २

खालील दोन प्रसंग मुलांना सांगा.

१) एकमेकांत गुंतण्याच्या/प्रेमात पडण्याच्या प्रक्रियेत असताना दोन महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनी समुद्रकिनाऱ्यावर जातात. एकांतात बसतात आणि जवळ बसण्यात, एकमेकांना स्पर्श करण्यात, हात हातात घेण्यात त्यांना आनंद मिळतो. दोघांचीही या गोष्टींना संमती असेल तोपर्यंत त्यांना यात आनंद मिळतो.

२) परंतु जेव्हा तो मुलगा मुलीच्या जरा जास्तच जवळ जाण्याचा प्रयत्न करतो, तिचे सक्तीने चुंबन घेण्याचा प्रयत्न करतो त्या वेळेस त्यात आनंद न राहता तो लैंगिक छळ ठरतो. जरी काही वेळेस ती मुलगी प्रत्यक्ष तसे बोलत नसली तरीही तिची अस्वस्थता त्या मुलाने समजून घेणे गरजेचे आहे.

या प्रसंगांच्या माध्यमातून आपल्याला विद्यार्थ्यांशी खालील मुद्द्यांवर चर्चा करता येईल.

* लैंगिकतेतील आनंद, त्यातील विविधता
* लैंगिक संबंध
* लैंगिक मर्यादा ओलांडणे म्हणजे काय?
* लैंगिकता व सत्ता



### लैंगिकतेतील आनंद

भावनिक व शारीरिक प्रतिसादातून लैंगिक आनंद व्यक्त करता येतो. लैंगिकता ही व्यक्तिगत असते व प्रत्येक व्यक्तिपरत्वे वेगळी असते. प्रत्येक व्यक्तीचा लैंगिकतेचा अनुभव (आनंद) वेगळा असतो. स्त्रिया व पुरुष यांत तर तो वेगळा असतोच. काही जणांना शारीरिक समाधानात आनंद मिळतो. काहींना भावनिक जवळीक पुरेशी असते तर बऱ्याच जणांना या दोन्ही गोष्टींची गरज भासते.

व्यक्तीची लैंगिकता ही बदलणारी असते. बहुरूपी असते. काळाच्या ओघात लैंगिकतेतील तीव्रता, महत्त्व परिस्थितीमुळे, अनुभवांमुळे, वातावरणामुळे, जाणिवांमुळे कमी-अधिक होत असते.

### लैंगिक संबंध

— यात नेहमीच दुसऱ्या व्यक्तीचा समावेश असतो.

— प्रत्येक व्यक्तीला स्वत्व व स्वप्रतिष्ठा असते. त्यामुळे लैंगिक वर्तनाला स्वयंशिस्त असणे व लैंगिक वर्तन जबाबदार असणे गरजेचे असते.

— लैंगिक संबंध हे परस्पर विश्वास, प्रामाणिकपणा, निष्ठा व आदर यांवर आधारित असले पाहिजेत.

— लोक आपापली लैंगिकता ही सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोनातून व वर्तनातून व्यक्त करीत असतात.

— जर लैंगिकता परस्पर संमतीने, परस्परांविषयीच्या आदरातून सकारात्मकरीत्या व्यक्त झाली तर ती आरोग्य व आयुष्याचा स्तर उंचावते.

— परंतु जर ती हिंसा-छळ-शोषण-शिवीगाळ यातून नकारात्मकरित्या व्यक्त झाली तर व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा नाश करते व दीर्घकाळ त्याचा परिणाम राहतो/भोगावा लागतो.

### लैंगिक मर्यादा ओलांडताना...

एक व्यक्ती म्हणून आपल्याला शारीरिक/भावनिक मर्यादा असतात.

या मर्यादांमुळेच आपण एक वेगळी व्यक्ती म्हणून ओळखले जातो/ आपली ओळख तयार होते.

उदा. खालील कृतींना वेगवेगळ्या लोकांचा प्रतिसाद वेगवेगळा असतो.

१) जेव्हा भिन्नलिंगी व्यक्ती तुम्हाला स्पर्श करते.

२) जेव्हा भिन्नलिंगी मित्र तुम्हांला आलिंगन देतो.

३) जेव्हा एखादा पुरुष एखाद्या स्त्रीकडे टक लावून पाहतो.

४) जेव्हा एखादा नवीन पुरुष सहकारी स्त्री सहकाऱ्याशी हस्तांदोलन करतो.

लैंगिक छळ व त्याच्याशी संबंधित गोष्टी स्पष्ट करण्यासाठी खालील मुद्द्यांची चर्चा करावी.

- प्रत्येकाच्या व्यक्तिगत मर्यादा या एकमेव असतात. जेव्हा आपल्याला गरज भासते तेव्हा आपण कुठे आहोत; कुणाबरोबर आहोत याचा विचार करून तसेच दुसऱ्या व्यक्तीबद्दलचा आपला दृष्टिकोन जाणीव व त्याची सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपण मर्यादांशी तडजोड करतो.
- लैंगिक मर्यादांवर आपण प्रत्येक जण ताबा ठेवत असतो. त्यामुळे कुणी मर्यादा ओलांडत असेल किंवा आपल्याला आवडत नसेल असे लैंगिक वर्तन करत असेल तर त्याचा निषेध करण्याचा हक्क आपल्याला असतो.
- आपल्या लैंगिक मर्यादा पाळणे म्हणजे दुसऱ्यांशी होणाऱ्या लैंगिक वर्तनाची जबाबदारी घेणे.
- जेव्हा पुरुष त्यांच्या मर्यादा ओलांडतात आणि स्त्रियांना अवघडलेपणाची जाणीव देतात तेव्हा स्त्रियांनी परिणामकारकतेने त्यांचा निषेध व्यक्त करायला शिकण्याची गरज आहे.
- आणि आपले लैंगिक वर्तन समोरच्या व्यक्तीला आवडत नाही हे समजण्याची गरज पुरुषांना आहे
- जेव्हा सक्तीने लैंगिक मर्यादा ओलांडल्या जातात तेव्हा लोक दुखावले



जातात.

- प्रत्येक लैंगिक छळाच्या प्रकरणात आरोपी व बळी पडलेली व्यक्ती यांच्यातील मर्यादांचे गंभीर स्वरूपात उल्लंघन झालेले असते.

**लैंगिकता व सत्ता**

लैंगिक छळ कामाच्या ठिकाणी कुठेही होऊ शकतो. यात सत्तेचा वापर केला जातो व बहुधा पुरुषांकडून स्त्रियांवर केला जातो आणि सहसा जेव्हा त्यांच्यातील औपचारिक स्थानांमध्ये फरक असतो तेव्हा केला जातो.

सत्ता व लैंगिकता यांचा संबंध खालील गोष्टींतून स्पष्ट करता येतो.

- सत्तेचा वापर लैंगिक छळासाठी होऊ शकतो.
- सत्तेमुळे आपल्याला हवे तेच लोकांकडून करवून घेण्याची ताकद मिळते.
- लिंग-वर्ग-धर्म-स्थान इत्यादी अनेक गोष्टींमुळे सत्ता मिळते.
- स्त्रियांच्या लैंगिकतेवर-मापदंड-कायदे-चालीरिती मूल्ये यातून समाज अंकुश ठेवत असतो. लैंगिकतेवरच्या चर्चेत पुरुषांचे अनुभव-गरजा याला प्राधान्य मिळते व स्त्रियांच्या अनुभवांकडे दुर्लक्ष होते.

पितृसत्ताक समाजातील लिंगभेदाचा उपयोग स्त्रियांच्या लैंगिकतेवर ताबा ठेवण्यासाठी केला जातो.

लैंगिक छळ ही सत्ता अधोरेखित करणारीच गोष्ट आहे.

* स्त्रिया व पुरुष समान आहेत व दोघांनाही प्रतिष्ठेने राहण्याचा समान अधिकार आहे.
* मुलींचे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि विविध उपक्रमांत त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी मुलांनी लिंगभाव/सामाजिक लिंगभेद यासंबंधी अधिक जागृत होण्याची गरज आहे.
* स्त्रियांनी/मुलींनी देखील जागृत होऊन साचेबद्ध भूमिका बदलण्यासाठी सक्षम होण्याची गरज आहे.

### सत्र तिसरे

## कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (महाविद्यालय)

एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी केलेले वर्तन तिच्या दृष्टीने साधे, सौम्य असले तरी दुसऱ्या व्यक्तीला ते दुखावणारे, अपमानकारक वाटले तर तो लैंगिक छळ होऊ शकतो.

खालील हेतू मनात ठेवून हे सत्र घ्यावे.

- लैंगिक छळाची व्याख्या करणे.
- छळाला बळी पडलेल्या व्यक्तीवर होणारा परिणाम जाणून घेणे.

**कृतिसत्र १**

विद्यार्थ्यांना त्यांच्या दृष्टीने लैंगिक छळ म्हणजे काय हे स्पष्ट करणारी ५ ते १० मिनिटांची छोटी नाटुकली सादर करावयास सांगावी. महाविद्यालयात-आवारात-वर्गात-विद्यार्थ्यांत-शिक्षकांत काय घडते, त्यांचा अनुभव काय आहे यावर ही नाटुकली आधारित असावी.

> – लैंगिकता असलेल्या वर्तनाचे प्रकार चौकट १ मध्ये ठळकपणे दिलेले आहेत. त्याचा उपयोगही विद्यार्थी करून घेऊ शकतील.

नाटुकल्यांवर आधारित चर्चेचा उपयोग सुप्रीम कोर्टाने लैंगिक छळाची जी व्याख्या केली आहे, ती स्पष्ट करण्यासाठी होऊ शकेल.



**व्याख्या**

न आवडणारे कोणतेही लैंगिक वर्तन म्हणजे लैंगिक छळ.

उदाहरणार्थ,

शारीरिक स्पर्श व जवळीक

लैंगिक प्रतिसादाची मागणी किंवा विनंती.

कुठलेही न आवडणारे शारीरिक, शाब्दिक, अशाब्दिक लैंगिक वर्तन.

शिक्षकाने खालील वाक्ये स्पष्ट करणे व व्याख्येतील महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट करणे गरजेचे आहे.

— लैंगिक छळ हा सामाजिक वर्तणुकीचा एक दुखावणारा प्रकार आहे.

— एखाद्या व्यक्तीला उद्देशून किंवा ती हजर असताना लैंगिक स्वरूपाचे एखादे तोंडी किंवा लेखी विधान करणे. (जरी ते वाक्य त्या व्यक्तिसंदर्भात नसले तरी) हा लैंगिक छळ ठरतो.

— ज्या व्यक्तीचा लैंगिक छळ होतो त्याच्या दृष्टिकोणातून कायद्याने लैंगिक छळाची व्याख्या केलेली आहे.

— जेव्हा त्या व्यक्तीला अपमान झाल्यासारखे वाटेल, ती दुखावली जाईल किंवा घाबरेल तेव्हा तेव्हा लैंगिक छळ होत असतो.

> चौकट १
>
> **लैंगिक स्वरूपाच्या वर्तनाचे प्रकार**
>
> – पाठ थोपटणे, स्पर्श करणे, चिमटे काढणे, आलिंगन देणे, मिठी मारणे, चुंबन घेणे.
>
> – अगोदरचा नकार लक्षात न घेता पुन्हा पुन्हा सामाजिक कार्यक्रमात बरोबर येण्याची विनंती.
>
> – लैंगिक गोष्टींसाठी विनंती.

– व्यक्तीच्या दिसण्याबद्दल लैंगिक शेरेबाजी. लैंगिकतेच्या मर्यादा ओलांडणारे संदेश (SMS) भ्रमणध्वनीवर पाठवणे, फोन करणे.

– एखाद्या व्यक्तीकडे किंवा गटाकडे बघून दुसऱ्या गटाने शिट्ट्या मारणे किंवा लैंगिक शेरेबाजी करणे.

– चित्र, लैंगिक व्यंगचित्रे, अपमानास्पद भित्तिपत्रके लावणे.

– व्यक्तिगत अवकाशावर आक्रमण करणे.

– एखाद्याच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल कळत-नकळत सारखे प्रश्न विचारणे.



**सत्र चौथे**

## महाविद्यालयीन महिला विकास कक्षाची भूमिका

या सत्राचा हेतू

– लैंगिक छळाची तक्रार हाताळणे.

– महाविद्यालयीन महिला विकास कक्षाची भूमिका समजून घेणे.

चौकट २ मध्ये विशाखा × राजस्थान सरकार यांच्या खटल्याची पार्श्वभूमी दिलेली आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने लैंगिक छळाबद्दल मार्गदर्शक तत्त्वे का दिली हे शिक्षकांच्या लक्षात येईल.

चौकट २

**विशाखा व इतर विरुद्ध राजस्थान सरकार**

१९९२ साली भवरी देवी ही 'साथीन' खेड्यात विकासाचे काम करणारी स्त्री. ती बाल-विवाहाविरुद्ध प्रचार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी झालेली होती. अशाच काही वाईट प्रश्नांविरुद्ध काम करण्याच्या तिच्या प्रयत्नांमुळे ५ उच्चवर्णीय पुरुष संतापले होते. त्यांच्याकडे त्या गावाची सत्ताही होती. तिला तिच्या कामापासून परावृत्त करण्यासाठी व घाबरवण्यासाठी तिचा ते सतत लैंगिक छळ करीत होते. स्थानिक पदाधिकाऱ्यांविरुद्ध तिने कितीतरी तक्रारी नोंदवल्या. परंतु कायद्याची अंमलबजावणी करणारेच पदाधिकाऱ्यांच्या बाजूचे असल्याने तिला न्याय मिळू शकला नाही. कितीही अडचणी झाल्या तरीही भवरीदेवीने तिचे

काम थांबवले नाही. एका उच्चवर्णीयाच्या घरचा बालविवाह रोखण्याचा प्रयत्न तिने केल्यामुळे अगोदरच संतापलेल्या त्या ५ जणांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

१९९६ साली भवरीदेवीने सत्र न्यायालयात खटला दाखल केला. या गाजलेल्या खटल्यात त्या ५ जणांना फक्त नामधारी शिक्षा मिळाली व ते सुटले. भवरीदेवीने नंतर सुप्रीम कोर्टात खटला वर्ग केला परंतु त्याची सुनावणी अजूनही झालेली नाही.

परंतु भवरीदेवीवरील बलात्कार, तिच्यावरील अन्याय यामुळे कितीतरी व्यक्ती व संस्था 'विशाखा' या स्त्रियांसाठी काय करणाऱ्या संस्थेबरोबर एकत्र आल्या व त्यांनी सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला. त्यांची प्रमुख तक्रार अशी होती की स्त्रिया कामासाठी बाहेर पडतात परंतु कामाच्या ठिकाणी त्यांना लैंगिक छळाला सामोरे जावे लागते आणि त्यापासून त्यांचे रक्षण करणारा कुठलाही कायदा, नियम अस्तित्वात नाही. आणि म्हणून विशाखा व इतर संस्थांनी, स्त्रियांनी घटनेने बहाल केलेल्या व CE DAW (Convention on the Elimination of all forms of Discrimination Against Women) यासारख्या आंतरराष्ट्रीय करारामुळे स्त्रियांना मिळालेल्या मूलभूत हक्कांचे रक्षण व अंमलबजावणी व्हावी म्हणून सुप्रीम कोर्टाला विनंती केली. १३ ऑगस्ट १९९७ रोजी विशाखा व इतर संघटना यांच्या बाजूने सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला. कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ हा केवळ गुन्हाच नाही तर तो मानवी हक्काचा प्रश्न आहे हा महत्त्वाचा निर्णय कोर्टाने दिला. यातच 'विशाखा' निर्णयात कोर्टाने १९९३च्या मानवी हक्क कायद्याची दखल घेतली आहे हे स्पष्ट होते.

**लैंगिक छळ तक्रार निवारणाची पद्धती**

२००१ साली अस्तित्वात आलेला विद्यापीठ महिला विकास कक्ष व महाविद्यालय महिला विकास कक्ष हे विशाखा व इतर आणि राजस्थान सरकार या खटल्यानंतर सुप्रीम कोर्टाने दिलेल्या व मनुष्यबळ विकास



मंत्रालयाने अमलात आणलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून काम करते.

विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न संस्था व महाविद्यालयातील मुली, शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांच्याकडून आलेल्या लैंगिक छळाच्या तक्रारीचे निराकरण करणे व त्यांच्या कल्याणासाठी महिला धोरण अंमलात आणणे ही विद्यापीठ महिला विकास कक्षाची प्रमुख कामे आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४च्या कलम १४ व भाग ८ या अंतर्गत कुलगुरूंनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठ व महाविद्यालय महिला विकास कक्षाची रचना आधारलेली आहे. खाली दिलेल्या गोष्टींबरोबर २००८ सालच्या कुलगुरूंच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग लैंगिक छळ तक्रार निवारणासाठी करता येऊ शकेल.

तक्रार मिळाल्यानंतर महाविद्यालय महिला विकास कक्षाने खालीलप्रमाणे चौकशी सुरू करावी

— महाविद्यालयाने तक्रार महिला विकास कक्षाकडे पाठवावी.
— तक्रार मिळाल्यानंतर महिला विकास कक्षाने चौकशीचे आदेश द्यावेत व चौकशीची तारीख व वेळ याबाबत दोन्ही बाजूंना माहिती द्यावी.
— तक्रारदार व तक्रार ज्याच्याबद्दल आहे अशा दोघांनाही चौकशीची प्रक्रिया स्पष्ट करावी.
— नैसर्गिक न्यायाला धरून चौकशी होईल याची खात्री महाविद्यालय महिला विकास कक्षाने द्यावी.
— तक्रारीशी संबंधित सगळ्यांना साक्षी-पुराव्यांसकट आपली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे.
— दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे.
— तक्रारीशी संबंधित सगळ्या पुराव्यांचा, अर्जांचा विचार होणे आवश्यक आहे.
— महिला विकास कक्षाचे सदस्य न्याय्य व नि:पक्ष असणे आवश्यक आहे.

— चौकशीची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे.

— पूर्ण चौकशी प्रक्रियेचे कागद महिला विकास कक्षाने नीट जतन करून उभय पक्षांना द्यावेत.

— त्यांच्या चौकशी अहवालात महिला विकास कक्षाच्या सदस्यांना शिफारसी कराव्यात, एखाद्या सभासदाचा विरोधी सूर असेल. निरीक्षण असेल तर त्याचीही अहवालात नोंद व्हावी. ठराविक कालमर्यादेत महिला विकास कक्षाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे हे महाविद्यालय व्यवस्थापनाचे कर्तव्य आहे. जर त्या अंमलात आल्या नाहीत तर त्याची कारणे व्यवस्थापनाने देणे गरजेचे आहे.

अहवालाची प्रत उभय पक्षांना मिळाल्याची खात्री कक्षाने करून घेणे आवश्यक आहे.

**महिला विकास कक्षाचे उपक्रम**

उच्च शिक्षण दिले जाणाऱ्या संस्थांत लैंगिकदृष्ट्या सकारात्मक वातावरण/निरोगी वातावरण निर्माण होण्यासाठी काही उपक्रम राबविणे ही महिला विकास कक्षाची जबाबदारी आहे.

लिंगभाव–जाणीव कार्यशाळा विद्यार्थी व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्याबरोबर कशा प्रकारे आयोजित कराव्या याची ढोबळ रूपरेखा या पुस्तिकेत दिलेली आहे. तरीसुद्धा या पुस्तिकेतला आशय मुलांपर्यंत पोहचवण्यासाठी नवनवीन गोष्टी शिक्षकांनी विकसित कराव्यात. आत्मपरीक्षण वाढवण्यासाठी/शिकण्यासाठी गटचर्चा, नाटुकले, उदाहरणे अशा विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणाऱ्या गोष्टींचा समावेश कार्यशाळेत करावा.

विद्यार्थ्यांमध्ये लिंगभेद–जाणीव निर्माण होण्यासाठी घोषवाक्य, भित्तिपत्रक, निबंध स्पर्धा आयोजित कराव्यात. पथनाट्ये, फिल्म्स इत्यादी गोष्टींचा उपयोग विद्यार्थ्यांना समस्यांची ओळख करून देण्यासाठी करावा.

महिला विकास कक्षाने असे उपक्रम विद्यार्थी सभा, कलामंडळ, राष्ट्रीय सेवा योजना किंवा स्त्रियांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांबरोबर राबवावेत.

- स्त्रिया व पुरुष समान आहेत व दोघांनाही प्रतिष्ठेन राहण्याचा समान अधिकार आहे.
- मुलींचे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि विविध उपक्रमांत त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी मुलांनी लिंगभाव/सामाजिक लिंगभेद यासंबंधी अधिक जागृत होण्याची गरज आहे.
- स्त्रियांनी/मुलींनी देखील जागृत होऊन साचेबद्ध भूमिका बदलण्यासाठी सक्षम होण्याची गरज आहे.